जिल्हा क्रीडा संकुल, नागपूर या क्रीडा संकुलाच्या ₹१००.०० कोटी किमतीच्या अंदाजपत्रकास व निधी मंजूरीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः-ई नस्ती क्र. १६९७२६१/क्रीयुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दि.१४/०७/२०२६

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व क्रीडा विभाग क्रमांकः राक्रीधो-२००३/(प्र.क्र.११/०३)/ क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च, २००३.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. जिक्रीसं-१२२२/प्र.क्र. १३/क्रीयुसे-१, दि.१५/३/२०२२.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रं. राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/ क्रीयुसे-१, दि.२३/३/२०२२.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. विक्रीस-११२४/प्र.क्र १५९/क्रीयुसे-१, दि.२७/९/२०२४.
५) क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.जिक्रीसं/नागपूर/मंसुप्रमाप्र/२०२५-२६/का.९/८६७७, दि.३०.०३.२०२६
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. बीडीजी-२०२६/प्र.क्र. ३३/इमा-१, दि.०८/०६/२०२६.

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण, २००१ अन्वये महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत राज्यात क्रीडा विषयक सोयी सुविधा निर्माण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच सन २०१२ च्या राज्य क्रीडा धोरणास अनुसरून शासन निर्णय, दिनांक २३.०३.२०२२ अन्वये क्रीडा संकुलांची शासन अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

(अ) नव्याने प्रशासकीय मान्यता दिलेल्या, परंतु अद्याप बांधकाम सुरु झालेले नाही, अशा क्रीडा संकुलांबाबत सुधारीत अनुदान मर्यादा:-

क्रीडा संकुलाचा प्रकार	सुधारीत अनुदान मर्यादा लाखात
तालुका क्रीडा संकुल	रु.५००.०० लक्ष
जिल्हा क्रीडा संकुल	रु.२५००.०० लक्ष
विभागीय क्रीडा संकुल	रु.५०००.०० लक्ष

(ब) अंदाजपत्रक/सुधारीत अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता/सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेल्या/ बांधकाम पूर्ण झालेल्या /बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या /अपूर्ण क्रीडा संकुलांबाबत सुधारीत अनुदान मर्यादा:-

क्रीडा संकुलाचा प्रकार	सुधारीत अनुदान मर्यादा (रु.लाखात)
तालुका क्रीडा संकुल	रु. ३००.०० लक्ष
जिल्हा क्रीडा संकुल	रु. १५००.०० लक्ष
विभागीय क्रीडा संकुल	रु. ३०००.०० लक्ष

२. जिल्हा क्रीडा संकुल, नागपूर च्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती व मा. मंत्रिमंडळाची मान्यता मिळणेबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचा संदर्भ क्र.५ येथील प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावातील मुलांचे वसतिगृह (३०० बेड), मुलींचे वसतिगृह (३०० बेड), बहुउद्देशिय इनडोअर हॉल (G+1), २० मी व ५० मी. शुटींग रेंज (सर्व सुविधांसह), सोलर पॅनल -५० किलो वॅट, पाण्याची व्यवस्था (ओव्हर हेड टँक १ लक्ष लिटर), सिंथेटीक बास्केटबॉल विथ कोर्ट फेन्सिंग, विद्युतीकरण, हॉकी ॲस्ट्रॉटर्फ मैदान व प्लेअर एरीया, स्प्रिंकलर फॉर फुटबॉल मैदान, क्रीडा साहित्य, मिनी गोल्फ एडव्हेंचर सुविधा (होस्टेल बिल्डींगच्या टेरेसवर), ४०० मी. सिंथेटिक ट्रॅक, सिव्हर सिस्टीम, स्टॉर्म वॉटर लाईन व वॉटर सप्लाय लाईन, २ कबड्डी मैदान, २ खो खो मैदान, १ व्हॉलीबॉल मैदान, ७० मिटर आर्चरी रेंज (सर्व सुविधांसह, मैदानावरील प्रसाधनगृह व चेंजिंग रुम (मुल व मुली स्वतंत्र), पाण्याची व्यवस्था (अंडर ग्राऊंड वॉटर टँक), मिनी गोल्फ स्ट्रक्चर व इतर खर्च इ. क्रीडा सुविधांच्या रु.१००.०० कोटी किमतीच्या अनुदान मर्यादेबाहेरील अंदाजपत्रकास उच्च स्तरीय सचिव समितीने दि.२०.०५.२०२६ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. तसेच सदर अंजापत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस दि.२५.०६.२०२६ च्या बैठकीत मा. मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार जिल्हा क्रीडा संकुल, नागपूर च्या रु.१००.०० कोटी किमतीच्या अनुदान मर्यादेबाहेरील अंदाजपत्रकास व निधी मंजूरीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

जिल्हा क्रीडा संकुल, नागपूर या क्रीडा संकुलाच्या रु.१००.०० कोटी किमतीच्या अनुदान मर्यादेबाहेरील अंदाजपत्रकास व निधी मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.

२. विशिष्ट अनुभव आवश्यक असणाऱ्या बाबींसाठी देशातील अनुभवी क्रीडा विषयक कंत्राटदाराशी मुख्य कंत्राटदाराने Joint Venture करुन निविदा सादर करणे आवश्यक राहील.

३. या होणारा खर्च “मागणी क्र.ई-३, लेखाशीर्ष क्र.२२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४, क्रीडा व खेळ, योजनांतर्गत योजना, (१६) (०२), क्रीडा संकुलाची स्थापना, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२०४-१८२७)” या लेखाशीर्षाखालील तरतुदीतून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.२५.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१४१७३४३१४०४२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK HANMANLU DAMAYYAWAR

Digitally signed by ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=A72A631BF4E6911D7FAC836DDFB07663FE2C2481CDDF399C406576B02F63BCD8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2CC45C1C1345A8B6FF1E9FDBD2D12C6527F6D070C05B708BCC57B79B7EF3A95D, cn=ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
Date: 2026.07.14 17:35:28 +05'30'

(अशोक ह. दमय्यावार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव,
५. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
७. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा / विधानपरिषद, यांचे स्वीय सहायक, मुंबई.
१०. सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
११. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग यांचे स्वीय सहायक.
१२. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१५. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर.
१६. जिल्हा क्रीडा अधिकारी, नागपूर.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर (संचालनालयाद्वारे)
१८. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (संचालनालयाद्वारे)
१९. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. निवड नस्ती (क्रीयुसे-१).